# ।। अवघी विठाई पंढरीचा राणा ।।
# ।। कटेवर हात विटेवरी उभा ।।




।। संपादक ।।
सचिन काकडे (मुंबई)

।। अतिथी संपादक ।।
श्री. उपेंद्र चिंचोरे (पुणे)

।। सह संपादक ।।
सोनाली घाटपांडे (पुणे)
स्वप्ना कोल्हे (नाशिक)
भारती सरमळकर (मुंबई)

।। पेज आर्टवर्क ।।
अमृता ढगे (मुंबई)

ई साहित्य प्रतिष्ठान

# ।। संपादकीय ।।

नमस्कार माऊली. . .

बोलावा विठ्ठल । पहावा विठ्ठल । करावा विठ्ठल । जीवेभावे ।।

हा भाव अखंडीतपणे जपणा-या संताच्या या महाराष्ट्र भुमीचा सा-या विश्वालाही हेवा वाटतो तो "पंढरीच्या वारी" ने, पंढरीची वारी, जयाचीया कुळी । त्याची पायधुळी लागो मज । असे श्री संत नामदेव महाराज वदतात. पंढरीचा वारकरी । त्याचे पाय माझे शिरी ।। असे म्हणणा-या संत जनाबाई पंढरीचे वारकरी । मोक्षाचे अधिकारी । असे म्हणणारे संत तुकाराम, पण त्यांनासुध्दा मोक्ष नको आहे . त्यांना वारकरीच राहणे अतिशय प्रिय. म्हणुनच ते म्हणतात कि, सांडुनी पंढरीची वारी । मोक्ष मागती ते भिकारी ।। पंढरपुरात वैकुंठापेक्षा जास्त सुख व आनंद भरलेला आहे. सुखालागी जरी करीशी तळमळ । तरी तु पंढरीशी जाई एकवेळ । असे स्वतःच्या अनुभावानंतर श्री संत नामदेव महाराज जनतेला सांगतात, न करी आळस जाय पंढरीशी । अवघी सुखराशी तेथेच आहे । असे म्हणणा-या संत चोखोबांचाही अनुभव सारखाच आहे. म्हणुनच सर्व संत म्हणतात की "वैकुंठाशी आम्हा धाडु नको हरी । वास दे पंढरी सर्वकाळ ।। अशी ही "पंढरीची वारी" पंढरीत पोहोचते तो दिवस म्हणजे "आषाढी एकादशी" आपल्यासारख-या नेटीझन्सपर्यंत , ईंटरनेटच्या जगातल्या युगात असलेल्या तमाम मराठी जनांनपर्यंत मराठी साहित्य पोहोचविणा-या 'नेटाक्षरी' ची आषाढी एकादशी निमित्त ही साहित्यवारी. . आपल्या संस्कृतीचा, सणवार, उत्सवांच्या महतीचा अनमोल ठेवा जपणे हाच नेटाक्षरीचा अट्टहास

बोला पुंडलिका वरदे . . हारी विठ्ठल . . .
श्री ज्ञानदेव.... तुकाराम. . .
पंढ़रीनाथ महाराज़ की . .. जय..
विठ्ठल..।। विठ्ठल..।। विठ्ठल..।। विठ्ठल..।।.


।। सचिन काकडे ।।

(संपादक)

मुंबई

# ।। वाचे वदता विठ्ठल ।।

कान कसे रे किटल ? वाचे वदता विठ्ठल ।। धृ ।।

रोजचेच काम-धाम, केव्हा कुठेसा विश्राम ।
देहदीप रे मिटलं, वाचे वदता विठ्ठल ।। १ ।।

सारं आयुष्य जंजाळ, विषय वासना वंगाळ ।
जिणे जळेल जटील, वाचे वदता विठ्ठल ।। २ ।।

दृष्ट दंभादी दडावा, जीव शिवासी जडावा ।
कष्ट किमये कटल, वाचे वदता विठ्ठल ।। ३ ।।

चालु आलो दुरदेशी, आलो विठु चरणाशी ।
पारण डोळ्याच फ़िटलं, वाचे वदता विठ्ठल ।। ४ ।।

डोळे भरु पाहे तुला, सुख येई माझ्या कुळा ।
सुख शांतीत साठलं , वाचे वदता विठ्ठल ।। ५ ।।

भाव भाविकासे भेटे, खुळ्या खट्याळासी खेटे ।
दैव देहात पटलं, वाचे वदता विठ्ठल ।। ६ ।।

भक्तीगंगा वाहे दुथडी, घेई सर्वांगॆ मी उडी
पैल मोक्षाच गाठलं, वाचे वदता विठ्ठल ।। ७ ।।

## ।। उपेंद्र चिंचोरे ।।
(पुणे)

## ।। अतिथी संपादक श्री. उपेंद्र चिंचोरे यांचा अल्पसा परीचय ।।

पुण्याच्या गरवारे कॉमर्स कॉलेज मधुन निवृत्त, लहानपणापासुनच संगीताची गोडी, साहित्याची आवड,कथा – काव्य वाचल्यावर, त्या त्या लेखक – कवींना, कलावंतांना पत्र पाठविण्याचा गेली पंचेचाळीस वर्षांचा छंद अनेक साहित्यिक, कलावंत , खेळाडु , शास्त्रज्ञ, यांची आलेली असंख्य पत्रे , म्हणजे मौलिक ठेवा आहे उदा. माननीय पु. ल. देशपांडे , गो. नि. दांडेकर , रणजित देसाई, शिरीष पै, पं. जसराजजी, भारतरत्न लतादीदी मंगेशकर, अमिताभ बच्चन, सुनिल गावस्कर, डॉ. जयंत नारळीकर सर, व.पु. काळे त्याचे गुरुबंधु, तर पुज्य शांताबाई शेळके यांचा सलग एकतीस वर्षांचा सहवास, श्री चिंचोरे यांना लाभला कै. प्राचार्य राम शेवाळकरांच्या पुस्तकांचे शब्दांकन करण्याची सुसंधी त्यांना लाभली होती.

श्री उपेंद्र चिंचोरे यांची पहिली कविता मार्च १९६९ मधे प्रसिध्द झाली होती आजवर विविध वृत्तपत्र, मासिके, विषेशांक , गौरवग्रंथ यांमधुन त्यांचे अनेक लेख कविता प्रसिध्द झाले आहेत.

“संस्कार” या त्यांच्या लेखाला मा. बाबासाहेब पुरंदरे ह्यांच्या हस्ते सुवर्णपदक प्राप्त झाले होते.

“गाणे विज्ञानाचे“ या त्यांच्या गीताला मा. राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम सरांचे सन्मानपत्र लाभले आहे.

भारतीय वायुसेनेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री ऊपेंद्र चिंचोरे यांनी लिहिलेल्या गीताचा मा. एयर मार्शल बी. एन. गोखले यांनी गौरव केला होता.

“गाणारं झाड” “पुणेरी” ह्या गाण्याच्या अल्बम मध्येही त्यांची गाणी प्रसिद्ध झाली आहेत.

“मोटार चालली हवेतुन” हे शिर्षक असलेल्या श्री चिंचोरे यांच्या काव्य संग्रहाचे प्रकाशन साहित्य सम्मेलनाध्यक्ष डॉ. द. भि. कुलकर्णी ह्यांच्या हस्ते झाले.

पुणे आकाशवाणी केंद्रावरुन आजवर त्यांचे कविता वाचनांचे अनेक कार्यक्रम सादर झाले आहेत.

# ॥ अतिथी संपादकाच्या लेखणीतून ॥



ई-साहित्य प्रतिष्ठान चे मराठी साप्ताहिक नेटाक्षरीच्या सन्माननीय वाचकहो नमस्कार !!

परमब्रम्ह 'विठाई' माउली, म्हणजे आपल्या सर्वांचे आराध्य दैवत, त्यातही आषाढी एकादशी म्हणजे, समस्त वारक-यांच्या जीवनामधील पर्वणीचा क्षण. घर-दार विसरुन, तहान-भुक त्यागुन, ह्या वैष्णवांचे पाय श्री क्षेत्र पंढरपुरीच्या दिशेने झपझप चालु लागतात. आषाढी वारी मागची भुमिका तरी काय असावी, असा प्रश्न मनात येतो ना ? मित्र हो , विज्ञानाने अवघ्या विश्वाला जवळ आणले आहे. इंटरनेटच्या धावत्या युगात तर मानवाच्या आयुष्यात भौतिक सुखाची प्रचंड रेलचेल आहे, चंगळ आहे. पण हे सुख शाश्वत आहे का ? कारण इंटरनेटच्याच बाबतीत बोलायचे झाले तर, कालचे ज्ञान आज जुने झालेले असते। कारण नवा शोध ! याचा अर्थ भौतिक सुखाचा स्वीकार करायचा असे नाही, पण त्याच बरोबर मनःशांती देणा-या शाश्वत सुखाचा शोध घेतला पाहीजे। आणि मग लक्षात येत कि, शाश्वत सुख पारमार्थिक जीवनात ओतःप्रत भरलेले आहे, आवश्यकता आहे ती फ़क्त आपण ते स्विकारण्याची। अठ्ठावीस युगांहुनही अधिक काळ लोटला तरिही श्री क्षेत्र पंढरपुरीच्या चंद्रभागेतटी हा जगजेठ्ठी आपल्या परम भक्तांच्या भेटीसाठी अविश्रांत उभा आहे। मित्रांनो, श्री विठ्ठल हे परम सुखचे साध्य आहे, तर हे वारकरी त्यांचे भाविक साधक आहेत आपल्या पवित्र 'भागवत' धर्माची ही वारीची गुढी, रुढी होउन ती समस्त वारक-यांच्या जीवनाचा अविभाज्य घटक झालेली आहे. "पंढरीची वारी' ही महान आहे , श्रेष्ठ आहे, अवर्णनीय आहे।

आषाढीच्या या वारी मध्ये कुणीही वारकरी होउ शकतो इथे जात-पात, धर्म-पंथ, स्त्री-पुरुष, रंक-राव, असा कुठलाही भेदभाव नसतो. आता तर अनेक समृध्द विदेशी लोकही आत्म सुखाच्या शोधासाठी पंढरीच्या वारीत सहभागी होउ लागले आहेत, हे तर भागवत धर्माचे महान मर्मच म्हणावे लागेल. त्या सावळया पांडुरंगाच्या दर्शनाची ओढ असणे आणी ती मनोभावे जपणे, हाच स्थायीभाव वारक-यांचा असतो.

पंढरीची ही वारी म्हणजे जणु बिन भिंतीची महान शाळाच असते, समुहाने राहाणे, एकोप्याने जगणे, सत्संग अनुभवने, सद्विचारांचे आदान-प्रदान करणे, यात्रा म्हणजे सह-प्रवास यांचे प्रत्यंतर वारीमध्ये येते, मग ते मजल-दर-मजल चालणे असो, किर्तन-प्रवचनात रंगणे असो, भजनात दंगणे असो, वा चंद्रभागेत स्नान करणे असो, या सर्व गोष्टीत सहजीवनाची शिकवण आपोआप मिळत जाते वारक-यांच्या वाटचालीत शिस्त असते. चालणॆ म्हणजेच जगणे, असा संदेश या वारीतुनच मिळत असतो विचार आणि आचार हे दोन्ही टाळ जेव्हा एकत्र येतात, तेव्हा अंतर्मनाची एकतारी " विठ्ठल विठ्ठल " म्हणु लागते.

वारी मध्ये भजन-किर्तन-प्रवचन चालु असते माणसांचे ओढाळ मन प्रयत्नाने स्थिरावु लागते, मनाची चंचलता लयास जाते, श्रवण भक्तीने मनाची एकाग्रता वाढीस लागते आणि मग हळुहळु लक्षात येउ लागते ती मनःशांतीच्या सुखाची अवीट गोडी.

श्री संत शिरोमणी ज्ञानेश्वर माउली, जगत्गुरु श्री तुकाराम महाराज, नामदेव, एकनाथ महाराज, निवृत्ती महाराज, सोपानदेव, गोरा कुंभार, चोखोबा, मुक्ताबाई, जनाबाई आदि संताच्या अभंग रचनेमध्ये सुखाचा सागर आहे, जीवनाविषयीचे महान तत्वज्ञान सोप्या बोलीभाषेत माणसाला शहाणे करते, त्यांच्या महान शिकवणीमुळेच, पंढरीची ही वारी अव्याहत चालु आहे, हि मोक्षदाई वाट आगे, या वाटेवर भक्तीचे मळे आहेत, प्रत्येकाच्या मनात "माझी विठाई माऊली" हाच श्रध्दा भाव ठाई-ठाई असतो. देहभान विसरुन वारी रमणे हाच स्वभाव होतो. जीवाचे जीवाला, जिव्हेविण इथे जिव्हाळा देणारा, भक्तांचा लाडका कनवाळू, कानडा विठ्ठलु, तो हाच हि खुणगाठ मनाला पटते. तेव्हा "वारकरी" अशी संज्ञा त्यांना आपोआप प्राप्त होते.

आई-वडीलांच्या सेवेत खंड पडु नये म्हणुन, साक्षात पंढरीनाथालासुद्धा विटेवर तिष्ठत उभे ठेवणा-या भक्त श्रेष्ठ श्री पुंडलिकाच्या पायरीचे दर्शन घेउन, त्याला वारकरी जणु प्रार्थना करतात. " देवा, तुझा हा भाव आमच्या चित्ती ठसु दे!!" पंढरीच्या त्या वारीचे वर्णन करण्यास माझी लेखणी उणी आहे, मती थिटी आहे.

समस्त वाचकंनो आम्ही कुणी पंत नाही , पंडीतही नाही पण या वारीचे श्रद्धाळु भावनेने बारीक निरीक्षण करणारे, "मानस वारकरी" होण्याचा प्रयत्न करीत आहोत.

नेटाक्षरीच्या या अलौकिक विशेषांकामध्ये आमच्यापैकिच काही लेखक-कवींनी वारी विषयीच्या त्यांच्या भावना शब्दांकित करण्याचा नम्र प्रयत्न केला आहे, इथे दृष्टांत दिसेल, अनुभुती दिसेल, छंदबद्ध अभंग ओव्या वाचावयास मिळतील। थोडक्यात काय तर हा विशेषांक म्हणजे आपल्या साखच्या चोखंदळ वाचकांसाठी वारीच्या पुर्णानंदाचा अनमोल ठेवा आहे, ईप्सित ध्येय गाठणे हा आमचा श्वास आहे तर त्यासाठी मार्गक्रमणा करणे हा आमचा विश्वास आहे.!!

वारकरी एकमेकांना संबोधताना "माऊली" म्हणतात, मला वाटते आपण चतुर, चाणाक्ष वाचकही आमच्या प्रती "माऊली"च आहात त्यामुळे आपला अभिप्राय, हा आमच्या करीता, विठु माऊलीचा कृपाशिर्वादच असेल.!!! धन्यवाद !!!

॥ उपेंद्र चिंचोरे ॥
अतिथी संपादक (पुणे)
Email.chinchoreupendra@yahoo.com

# ।। वाट पंढरीची ।।

ग्यानबा तुकाराम । ग्यानबा तुकाराम । ग्यानबा तुकाराम ।

चला चला चालु । वाट पंढरीची । ओढ़ विठाईची लागलीसे ।। १ ।।
नका राहु मागे । लावु नका नाट । पहायाचा थाट । विठाईचा ।। २ ।।
घर संसाराची । मुळी नको चिंता । सोडविल गुंता जगजेट्टी ।। ३ ।।
चद्रभागे तीरी । धनी वैष्णवांचा । अनाथ-नाथांचा । पांडुरंग ।। ४ ।।
आपुल्या भक्तांना । विठु घाली साद । देई तो प्रसाद । कृपावंत ।। ५ ।।
चालु अनवाणी । बोचती न काटे नाही आडवाटे चालायचे ।। ६ ।।
दिंड्या-पताकांच्या । सागरी भिजुया । विठ्ठल भजुया । पदोपदी ।। ७ ।।
सरता सरेल । अवघट घाट । सापडेल वाट । जीवनाची ।। ८ ।।
दिसामाजी चालु । रातीचा विसावा । केशव वसावा । सोबतीला ।। ९ ।।
विसावा घेताना । म्हणु हरीपाठ । आणि करु पाठ । घराकडे ।। १० ।।
गळ्यामध्ये घालु । तुळशीच्या माळा । कपाळाला टीळा । चंदनाचा ।। ११ ।।
कुणी शिरी घ्यावी । पावन तुळशी । उदक कळशी । कुणा डोंई ।। १२ ।।
आळी पाळी होऊ । पालखीचे भोई । जन्माची पुण्याई । कामी येई ।। १३ ।।
गजर नामाचा । अविरत करु । भेटेल सोयरु । सकळांसी ।। १४ ।।
माऊली माऊली । बोले पखवाज । त्याविण आवाज । ऐकु न ये ।। १५ ।।
टीपेला पोचता । टाळ नि मृदंग । नाचेल श्रीरंग । पाहु डोळा ।। १६ ।।
माऊली मुक्ताई । दैवी त्यांचे विश्व । नाचती दो अश्व । वारीमध्ये ।। १७ ।।
हमामा फ़ुगडी । खेळू रिंगणात । मध्ये अंगणात । चक्रपाणी ।। १८ ।।
पाप क्षाळण्यासी । नित्य वाहे भीमा । धुवेल काळीमा । लगोलग ।। १९ ।।
दिसता दुरुनी । राउळ गोपुर । भरेल हो उर । आनंदाने ।। २० ।।
पुंडलिकाची ती । नमिता पायरी । जुळेल सोयरी । विठाईशी ।। २१ ।।
सांगावा हरीचा । वारंवार यावा । धन्य झालो देवा । जन्मोजन्मी ।। २२ ।।
जय जय विठ्ठल रखुमाई । विठ्ठल रखुमाई । विठ्ठल रखुमाई ।।

## ।। उपेंद्र चिंचोरे ।।


बोलावा
विठ्ठल
पहावा
करावा
जिवभावे ॥

# ।। आषाढी एकादशी ।।

आषाढ़ शुध्द एकादशीला महाएकादशी म्हणतात. या दिवशी भगवान विष्णु सागरात शेषावर शयन करतात. म्हणुन त्याला शयनी एकादशीही म्हणतात.
हा सोहळा पंढरपुरास पहावयास मिळतो. हा दिवस महाराष्ट्रात अत्यंत महत्वाचा मानन्यात येतो. महाराष्ट्राच्या कानाकोप-यातुन लाखो भक्त भाविक विठु नामाचा जगर करीत पंढरपुरास चालत येतात, चंद्रभागेत स्नान करुन विठ्ठलाचे दर्शन घेतात। आषाढीला या दिवशी पंढरपुरास आळंदींहुन संत शिरोमणी ज्ञानेश्वर माऊलींची, देहुहुन संत तुकाराम महाराजांची, त्र्यंबकेश्वरहुन निवृत्तीनाथांची, सासवडहुन सोपानकाकांची, पैठणहुन संत एकनाथ महारांजाची तर उत्तर भारतातुन संत कबिरांची पालखी येते.

आषाढीच्या वारीस सुगीची उपमा दिलेली आहे. ज्याप्रमाणे शेतकरी सुगीस धान्य भरतो व वर्षभर वापरतो। त्याचप्रमाणे आषाढी वारीच्या दिवशी पंढरीच्या पावननगरी वारकरी भक्तिची, प्रेमाची साठवण करतो आणि तेच वर्षभर व्यवहारात वापरतो.

पौराणिक काळी मृदुमान्य नावाच्या राक्षसाला भगवान शंकरांची आराधना करुन “तुला कोणाकडुनही मृत्यु येणार नाही, फ़क्त एका स्त्रीच्या हातुन तुला मृत्यु येईल.” असा वर मिळतो त्यामुळे उन्मत मृदुमान्य राक्षस देवांवर स्वारी करतो व त्यांचा पराभव करतो. सर्व देव पराभुत होऊन एका गुहेत लपतात. क्ष्याच दिवशी “**एकादशी**” देवतेचा जन्म होतो व ती मृदुमान्य राक्षसाचा वध करुन देवांची मुक्तता करते. त्यावेळी पाऊस पडत असल्याने सर्व देवांचे स्नान होते आणि गुहेत असल्याकारणे त्यांचा उपवासही घडतो. त्या दिवसापासुन एकादशीचे व्रत उपवास म्हणुन करण्याचा प्रघात पडला आहे.

परस्परांवर प्रेम करणे, प्राणीमात्र, अपंगांवर प्रेम करणे , गरजवंतांना मदत करणे ही शिकवण हा दिवस आपल्याला देतो.

# ।। विठ्ठल-विठ्ठल ।।

संताचा विठ्ठल
भक्तांचा विठ्ठल
चरा चरा माजी
विठ्ठल विठ्ठल

भक्तांच्या कारणे
युगे अठ्ठावीस
विटेवरी उभा
विठ्ठल विठ्ठल

सकल संतांचा
सावळा विठ्ठल
परब्रम्ह रुप
विठ्ठल विठ्ठल

आषाढी कार्तिकी
वाळवंटी उभा
भक्तांच्या स्मरणे
विठ्ठल विठ्ठल

वारीच्या निमित्ते
जमती भक्तगण
गर्जीती नामघोष
विठ्ठल विठ्ठल

करविण्या भेट
आत्म्या परमात्म्या
आनंद निधान
विठ्ठल विठ्ठल

## ।। सुनील जोशी ।।

# ।। दर्शन ।।

पांडुरंग पांडुरंग दर्शन दे रे
कधीचें प्राण माझे नयनी उभे रे ।। धृ ।।

नाण्यावरी ठसा जसा, दिवा मंदीरात
तसा तुच सामावला माझ्या अंतरात
चितळु दे काया, तुझ्या मुर्तीत घे रे ।। १ ।।
पांडुरंग... पांडुरंग...

ऐकियले जनाघरी जाते तु ओढीले
नरहरी सोनाराचे दागिने करीले
देई हाक येथ पहा, लेकरु तुझे रे ।। २ ।।
पांडुरंग... पांडुरंग...

जन म्हणे विठोबाच्या नादी खुळावला
दृष्टाळला जन्म सारा, संसार नासला
उत्तराया तुच नाथा, प्रकटोनी ये रे ।। ३ ।।
पांडुरंग... पांडुरंग...

## ।। कौस्तुभ आपटे ।।
डोंबिवली

# ।। तोचि विठ्ठल ।।

थकतो भागतो
आणि पहुडतो
बांधाच्या चिंचेखाली

चिचेची फ़ांदी
जो हलवी वारा

तो वाराही
असतो विठ्ठल ।।

आभाळ बदलतो कुस
होवूनी खुष
बरसतसे ढेकळात

ढेकळातुन
फ़ुटे अंकुर

त्या मुळातही
वसतो विठ्ठल ।।

तरसुन विसरतो भान
होई बेभान
दिंडीच्या रिंगणात

हातात टाळ
मुखी “इठ्ठाठ्ठा. . . ल. .”

त्या रींगणी ही
नाचतो विठ्ठल ।।

कोसभर दुर जनांचा पुर
पुराचा ओघ
फ़ेकलेल्या विटेशी

सावल्या घरी
‘चंद्री’ च्या तीरी

त्य चंद्रभागेत
नाहतो विठ्ठल ।।

भेटीस घेतला वेळ
स्विकार माळ
अश्रुंच्या मोत्यांच्या

धरतो चरण
आलो मी शरण

शरणी आलेला
तो ही विठ्ठल ।।

**।। प्राजक्त देशमुख ।।**
(नाशिक)

# ।। जय जय रामकृष्ण हरी ।।

नामात तुझिया धनुष्याचा टणत्कार
टाळ मृदगाचा कर्णमधुर झणत्कार
विठ्ठल माझा निपुण मुर्तीकार
भेदुन काढतो जळमटे निर्विकार

"रामकृष्णहरी" मंत्र षडाक्षार
आत्मानंदाचा हृदयी साक्षात्कार
विठ्ठल माझा करतो चमत्कार
गोव-या थापतो शेणी घुमटकार

समाधी लावितो स्थितप्रज्ञ स्तब्धकार
नामाची भक्ती देतो दिक्षात्कार
विठ्ठल माझा खुप आज्ञाकार
विटेवर उभा कर कटीकार

उभा चंद्रभागे तीरी तिर्थकाड़
मुळचा कन्नड भुमी अय्यंगार
पांडुरंग माझा खीर चाखनकार
राखितो गुरे चोखाची राखणदार

भक्तांचा तो कष्ट तारणहार
महाराष्ट्राचा दैवत शिरोधार
विठ्ठल माझा ह्रुदयी शिलेदार
चरणी मस्तक तुमच्या पालनहार

## ।। सुधाकर बर्गे ।।

(आफ़्रिका)

## ।। विठ्ठल नामे जनी रंगली ।।




विठ्ठल नामे जनी रंगली
एकतारी नामा वाजवी
आरंभली पुजा मानस
अर्पियेली ती विठ्ठल पाउली
जात्याच्या झाल्या चिपळ्या
टाक झाले पेले पातेली
पाणी विहिरीचे झाले हो तीर्थ
स्नाना आली विठू माऊली
पीठ दळले ते अष्टगंधी
विठ्ठला लावले ते कपाळी
गळी विठ्ठला लुगड्याची घडी
परी भासे ती वैजयंती बरवी
झटकनीचे जहाले उपरणे
विठ्ठल तेच वाटे जरतारी
फ़ोडणीचें झाले अत्तर
सुवासात न्हाला विठ्ठल
पंचप्राण ओतले निरांजनी
तीच विठ्ठला धुपदीप
वेदनांचा झाला कापुर
ओवाळीते कर्पुरारती
झोपडी जनीची जाहली राऊळ
अवतरली विठू माऊली
जनी जाहली नादब्रम्ह
नामा तेजोमय सावली. . . . .

।। अनुजा (स्वप्नजा) मुळये ।।
(पुणे)

# ।। चाले पदन्यास पंढरीस ।।

विठु माऊलीची, धरुनीया आस
चाले पदन्यास, पंढरीस ।। धृ ।।

संसाराच्या व्यापी, होऊनी उदास
कायावाचा मने, जाहली निरस
मुर्ती विठ्ठलाची, वाटते परीस
चाले पदन्यास, पंढरीस ।। १ ।।

कोणा नाही तमा, उन नी पाउस
कधी अर्धेपोटी, कधी उपवास
ताटी येई तोच, वाटे गोड घास
चाले पदन्यास, पंढरीस ।। २ ।।

वाटे चालतात, कोस आणि कोस
मुखी एक नाम, उरी एक श्वास
अंतरी भजावा, राजा परमहंस
चाले पदन्यास, पंढरीस ।। ३ ।।

## ।। हरीश दांगट ।।

# ।। मुकुट मस्तकी ।।

मुकुट मस्तकी
पाहुनिया थेट
होयील की भेट
कैवल्याची ।। १ ।।

चंदन तो टीळा
शोभतसे भाळी
ब्रम्हानंदि टाळी
लागलीसे ।। २ ।।

पितांबर शोभे
परीधान ख्रास
भक्तांचा तो ध्यास
मनी आहे ।। ३ ।।

सावळे ते ध्यान
कर कटेवरी
चिंता नित्य करी
सकलाची ।। ४ ।।

वीट गोरोबाची
पावन ती झाली
चरणी लागली
सावळ्याच्या ।। ५ ।।

लागली समाधी
देवाचीच आता
आठवण होता
ज्ञानियाची ।। ६ ।।

## ।। रमेश टोंबरे ।।



# ॥ विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल ॥

रसिकांना नेहमी उत्तमोत्तम आणि नवनवीन काव्य पुरविण्याचा ई-साहित्य प्रकाशनाचा ध्यास 'नेटाक्षरी' जोमाने पार पाडत आहे. दर आठवड्यात मिळणा-या तुमच्या प्रतिसादांनी आमचा उत्साह द्विगुणीत होतोय, नेटाक्षरी हा साप्ताहिक अंक सध्या सुमारे ५०००० मराठी रसिकांना विनामूल्य वितरीत केला जातो. त्या व्यतिरिक्त वेबसाईट्वर व्हिजिट करुन वाचणा-यांची संख्या लक्षणीय आहे. हा अंक आपण आपल्या ईष्टमित्रांना फॉरवर्ड करण्यास आमची काही हरकत नाही परंतु असे करताना आमच्या आयडीचा अंतर्भाव केल्यास आम्ही आभारी राहू. मराठी कवितेची लोकप्रियता वाढवण्यास आपला हातभार लागावा ही इच्छा. आपल्या सारख्या रसिकांच्या सहाय्याने हा अंक लवकरच एक लक्ष वाचकांपर्यंत नियमित पोहचवण्याचा आमचा संकल्प सिध्दीस जाईल असा आम्हाला विश्वास आहे.

-----------------------

ई-साहित्य प्रतिष्ठानची इतर विनामूल्य ई-साप्ताहिके

ई-स्टाप, स्वरनेटाक्षरी ऑडियो अल्बम, बालनेटाक्षरी

प्रसिद्ध झालेली ई-बुक्स

टल्लीची शाळा

मकरंदच्या त्रिवेण्या

ग्रेव्हयार्ड लिटरेचर

चार क्षण

तो आणि ती

प्रियेचे अभंग

देशी दारुचे दुकान-3D

ई-शाळा

तो, मी आणि सिगरेट

-----------------------

हा विनामूल्य अंक नियमित मिळण्यासाठी तसेच

सूचना,अभिप्राय,प्रतिक्रियांसाठी..

**netaksharee@gmail.com**